# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३५२ ई मेल आय डी coegondwana@gmail.com


**जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/509 /२०१६** दि. २९/०२/२०१६

# अधिसुचना

## उन्हाळी २०१६ च्या परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्याबाबत

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना तथा संबंधितांना सूचित करण्यात येते कि, उन्हाळी २०१६ च्या परीक्षेकरीता Online परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्याची व परीक्षा शुल्क स्विकारण्याची अंतिम दिनांक **०३/०३/२०१६** पर्यंत वाढविण्यात आलेली असून महाविद्यालयाने परीक्षा शुल्क विवरण पत्र, **दिनांक ०३/०३/२०१६ च्या डी. डी. सह.,** Exam Form Submission Report व इतर दस्ताऐवज प्राचार्याच्या स्वाक्षरीसह प्रमाणीत करुन विद्यापीठात **दिनांक ०४/०३/२०१६ ला सायंकाळी ५.३० पर्यंत** सादर करावे.

तसेच ज्या महाविद्यालयांत खरीप हंगामातील हंगामी ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील शासन नियमाप्रमाणे पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र परीक्षा शुल्क न घेता स्विकारण्यात यावे. आणि जा.क्र./गों.विं./परीक्षा विभाग/४५४/२०१६, दि.२०/०२/२०१६ व जा.क्र./गों.विं./परीक्षा विभाग/४६६(A)/२०१६ दि.२२/०२/२०१६ च्या पत्रानुसार परीक्षा आवेदनपत्र, संबंधीत प्रपत्र, प्रमाणपत्र आणि संबंधीत आवश्यक दस्ताऐवज हे विद्यापीठात उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत सादर करावे. सोबत संलग्नित हमीपत्र महाविद्यालयाच्या कवरींग लेटरहेडवर प्राचार्यांच्या सही व शिक्यासह पाठविण्यात यावे. करीता नोंद घ्यावी.

मा. परीक्षा नियंत्रक,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयात सत्र २०१५–१६ च्या खरीप हंगामातील हंगामी ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील एकही विद्यार्थी प्रवेशीत नसुन उन्हाळी २०१६ परीक्षेकरीता सदर यादीच्या गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन अर्ज आलेले नाहीत.

अशा दुष्काळग्रस्त भागातील कोणत्याही विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क महाविद्यालयाने स्विकारलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क स्विकारल्यास सदर शुल्क परत करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील, संपुर्ण विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन अर्ज पडताळणी करूनच स्विकारण्यात आलेले आहे, ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावातील एकही विद्यार्थी बाधीत नाहीत.

प्राचार्यांची सही व शिक्का